I.O. प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन, विमानतळ * नांदेड *

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड    **P.S.(ठाणे):** विमानतळ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0403    **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/10/2024 19:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Date From (दिनांक पासून):** 01/10/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/10/2024

**Time Period (कालावधी):**

**Time From (वेळेपासून):** 06:35 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 10:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/10/2024    **Time (वेळ):** 18:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 028

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/10/2024 19:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 03 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शरयु मल्टीस्पेशालिटी हस्पीटल,संकेत हॉस्टेल रोडवर , तरोडा बु नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सौ. वर्षा व्यंकटी गाडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वामन दादा, कर्दकनगर,तरोडा बु,विमानतळ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वामन दादा, कर्दकनगर,तरोडा बु,विमानतळ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7276855910

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अकबर खान उस्मान खान | | | 1. नारायण पाटील नगर , ड काब्दे हस्पीटलच्या पाठीमागे, लालवाडी नांदेड,शिवाजी नगर, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | स्विकारलेली रक्कम नगदी | 2,000.00 |



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Va ue(In Rs/-) ( ुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | 2000 रुपये | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक ०१/१०/२०२४

मी सौ. वर्षा व्यंकटी गाडे, वय ३१ वर्ष, व्यवसाय सफाई कामगार, (कंत्राटी) नेमणुक, नांदेड वाघाळा शहर
महानगरपालिका नांदेड रा. लोण बु. ता. वसमत जि. हिंगोली ह.मु. वामन दादा, कर्दकनगर तरोडा बु.ता. जि. नांदेड
मोबाईल कमांक ७२७६८५५९१०

समक्ष पोलीस ठाणे विमानतळ, नांदेड जि. नांदेड येथे हजर येवुन फिर्याद देते की, मी वरील प्रमाणे राहणारी
असुन दिनांक ३०/०९/२०२४ रोजी लाप्रवि , नांदेड या कार्यालयात तकार दिली की, मी आर अँण्ड बी इन्फा
प्रोजेक्ट प्रा. लि. यांचेकडुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नदिड येथे सफाई कामगार म्हणून काम करते. मी
सध्या नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील चैतन्यनगर वार्ड क. २ मध्ये झाडु मारणे व साफ सफाईचे
कामे करते. मी ऑगस्ट २०२४ या महिन्यामध्ये महिनाभर काम केले होते. मला ऑगस्ट महिन्याचा पुर्ण पगार
मिळाला आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथील स्वच्छता निरिक्षक श्री अकबर साहेब हे सफाई
कामगारांवर देखरेख, हजेरी घेणे तसेच आमचेवर नियंत्रण ठेवण्याचे काम करतात. अकबर साहेव हे मला दोन-तीन
दिवसांपासुन म्हणत आहेत की, तुझे ऑगस्ट महिन्यामध्ये २५ दिवस कामाचे खाडे झाले आहेत. तरी तुला ऑगस्ट
महिन्याचा पुर्ण पगार मिळाला आहे. तु मला ५,०००/- रुपये दे, नाहीतर मी चालु महिन्यामध्ये तुझ्या २५
दिवसाच्या कामाचे खाडे टाकतो. मग तुला २५ दिवसाचा पगार कमी मिळेल. असे म्हणुन मला वारंवार पैशाची
मागणी करीत आहे. आम्ही काम केलेले हजेरीचे रजिस्टर हे अकबर साहेबांकडे असते. मी जर त्यांना पैसे दिले
नाहीतर ते मी केलेल्या कामाचे (हजेरी) रजिस्टरवर खाडे टाकतील. त्यांनी तसे केले तर मला सप्टेंबर या महिन्याचा
पगार कमी मिळेल. या भितीपोटी मी त्यांना नाईलाजास्तव पैसे देण्यासाठी होकार देवुन आपल्याकडे तकार
देण्यासाठी आलेली आहे. माझा व अकबर साहेब यांचा कोणत्याही प्रकारचा आर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार नाही
किंवा त्यांचा माझेशी वैर/दुश्मनी नाही. मी माझ्या कामासाठी दिनांक ०१/१०/२०२४ रोजी अकबर साहेब यांना
चैतन्यनगर, नांदेड भागात जावून भेटणार आहे. त्यादरम्यान अकबर साहेब यांनी मला मी केलेल्या कामाच्या
दिवसाचे खाडे न टाकण्यासाठी त्यांनी स्वतः किंवा इतरांमार्फत मला पैशाची मागणी करुन ती स्विकारल्यास
त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही होणेस विनंती आहे.अशा आशयाची तकार दिली होती.
मी दिनांक ३०/०९/२०२४ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पुढील कार्यवाही कामी आज दिनांक ०१/१०/२०२४ रोजी
पहाटे ०५:०० वाजताचे सुमारास मी लाप्रवि , नांदेड येथे हजर आली. कार्यालयात पोलीस उप अधीक्षक श्री पवार
साहेब, पोलीस निरीक्षक श्री वाघमारे, सापळा पथकातील सदस्य पोह/१८२१ शेख रसुल, पोह/कणसे, पोह/११४
राठोड, चालक पोना/मामुलवार, चालक पोह/गजानन राऊत, लाप्रवि , नांदेड, पंच सौ. वैशाली लांडगे, राहुल पाटील
असे हजर होते.
त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री सदानंद वाघमारे यांचे सुचनेवरुन पोह/राठोड यांनी मला व दोन्ही पंचाना डिजीटल
व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. पोलीस निरीक्षक श्री वाघमारे यांचे सुचनेप्रमाणे पोह/राठोड यांनी
पोलीस निरीक्षक श्री सदानंद वाघमारे, माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी
कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.



Scanned with CamScanner

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री सदानंद वाघमारे यांनी मला लोकसेवक अकबर, स्वच्छता निरिक्षक हे कुठे भेटतील
याबाबत विचारणा केली असता मी त्यांना सांगितले की, लोकसेवक अकबर साहेब हे सकाळी ०६.०० वाजताचे वेळी
शिवमंदिर समोर, चैतन्यनगर, नांदेड येथे सफाई कामगार यांची हजेरी घेणे कामी हजर येत असतात, त्यावेळी ते त्या
ठिकाणी भेटतील. पोलीस निरीक्षक वाघमारे यांनी सापळा पथकास, पंचास व मला सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय, नांदेड येथुन शिवमंदिर समोर, चैतन्यनगर, नांदेड कडे खाजगी कार क्रमांक
MH 14EH 1023 मध्ये मी व पंच क. १ सौ. वैशाली लांडगे, पोलीस निरिक्षक श्री वाघमारे साहेब, पोह/राठोड
असे चालक मामुलवार यांचे सह रवाना झालो. आमचे पाठोपाठ पोलीस उप अधीक्षक श्री पवार साहेब, पोह/शेख
रसुल, पोह/कणसे, चालक पोह/गजानन राऊत हे व पंच क्रमांक ०२ राहुल पाटील शासकीय वाहन MH 26 R
0657 ने रवाना झाले. शिवमंदिर समोर, चैतन्यनगर, नांदेड जवळ एका आडोशाच्या ठिकाणी दोन्ही वाहने
थांबविली. त्यानंतर पोलीस निरिक्षक, श्री वाघमारे साहेब यांचे सुचनेवरुन पोह/राठोड यांनी माझ्याजवळ डिजीटल
व्हाईस रेकॉर्डर चालु करून दिले ते मी माझ्या गळयात लटकावुन घेतले. त्यानंतर मला व पंच क. ०१ सौ. वैशाली
लांडगे यांना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. मी व पंच क्रमांक ०१ सौ. वैशाली लांडगे असे पायी
शिवमंदिर समोर, चैतन्यनगर, नांदेड समोरील रोडवर गेले. मी तेथे माझ्या सोबतच्या सफाई कामगारांसं बत तेथे हजर
होते. त्यावेळी काही वेळाने लोकसेवक अकबर, स्वच्छता निरिक्षक हे तेथे आले. त्यांनी नेहमी प्रमाणे सफाई
कामारांचा फोटो काढुन कामाचे वाटप केले. त्यांनी मला तेथे थांबण्यास सांगितले. काही वेळाने लोकसेवक अकबर,
स्वच्छता निरिक्षक माझ्याजवळ आले. त्यावेळी माझी व त्यांची माझे हजेरीच्या कामाच्या दिवसाच्या खाड्या बाबत
चर्चा झाली. त्यावेळी त्यांनी मला तुझ्या प्रमाणे काहीकर म्हणुन चार हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी
त्यांना तुम्हाला आता अर्धे पैसे देते असे म्हणाले. पैसे आणायचे विसरली आहे. तुम्ही तथागत नगर कडे या तुम्हाला
पैसे देते असे म्हणाली. त्यावेळी त्यांनी लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर मी, पंच क्रमांक १ असे
सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. पोह/राठोड यांनी माझे ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर घेवुन
०६:३५ वाजता बंद केले. त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघमारे यांनी मला व पंच कं. ०१ यांना पडताळणी कार्यवाही
दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यानंतर मी, पंच व संपुर्ण सापळा पथक लाचलुचपत प्रतिबंधक
कार्यालय नांदेड येथे परत आलोत.त्यानंतर सापळापुर्व व सापळा कार्यवाहीला सुरवात झाली. मी माझ्या जवळील
२,०००/- रुपये रक्कम (ज्यात पाचशे रुपये दराच्या चार भारतीय चलनी नोटा) पंचासमक्ष हजर केल्या. पोलीस
निरिक्षक श्री वाघमारे साहेब यांचे सुचनेवरुन पथकातील पोह/कणसे यांनी अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म व
अॅल्ट्राव्हाईलेट लॅम्प माहिती सांगुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पोलीस निरिक्षक श्री वाघमारे साहेब
यांनी सापळा कार्यवाहीचे अनुषंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. तसेच
लोकसेवक अकबर यांनी माझेकडुन अॅन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर कोणता ईशारा
करायचा ते सांगितले. त्यानंतर माझी पंच क्रमांक ०१ सौ. वैशाली लांडगे यांचेकडुन अंगझडती घेण्यात आली.
पोह/कणसे यांनी मी हजर केलेल्या २,०००/- रुपये रक्कमेस (ज्यात पाचशे रुपये दराच्या चार भारतीय चलनी
नोटा) अॅन्थ्रासिन पावडर लावुन मी नेहमी वापरत असलेले लहान कापडी पिशवीमध्ये ठेवले.त्यावेळी पोलीस
निरिक्षक, श्री वाघमारे साहेब यांचे सुचनेवरुन पोह/राठोड यांनी सांगितले की, आज रोजी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर
मध्ये साहावी फाईल तयार होईल त्यात सापळा कार्यवाही दरम्यान होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत होणार आहे. त्यानंतर
त्यानंतर आम्ही लाप्रवि , कार्यालय, नांदेड येथुन तथागत नगर, नांदेड कडे खाजगी कार क्रमांक MH 14EH
1023 मध्ये मी व पंच क. १ सौ. वैशाली लांडगे, पोलीस निरिक्षक श्री वाघमारे साहेब, पोह/राठोड असे चालक
मामुलवार यांचे सह रवाना झालो. आमचे पाठोपाठ पोलीस उप अधीक्षक श्री पवार साहेब, पोह/शेख रसुल,
पोह/कणसे, चालक पोह/गजानन राऊत हे व पंच क्रमांक ०२ राहुल पाटील शासकीय वाहन MH 26 R 0657 ने
०७:५० वाजता रवाना झाले. तथागत नगर भागात एका आडोशाच्या ठिकाणी वाहने थांबविली. त्यानंतर पोह/राठोड
यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला. तो मी माझ्या गळयामध्ये दोरीच्या सहाय्याने लटकवुन
दिला. त्यांनतर मी व पंच क.०१ सौ. वैशाली लांडगे पायी तथागत नगर येथील रोडवर गेलो. तेथे मो रोडवर झाडु
मारत होते. काहीवेळाने तथागत नगर येथे लोकसेवक अकबर, स्वच्छता निरिक्षक त्यांच्या मोटार सायकलवर आले,
त्यांनी चालु मोटार सायकलवर मला हजरीवर येण्यास सांगितले त्यामुळे मी माझे झाडु मारायाचे काम संपवुन
साईमंदीर चैतन्य नगर नांदेड कडे पायी निघाले माझ्या पाठोपाठ पंच कं. ०१ सौ. वैशाली लांडगे व सापळा पचक
साईमंदीर चैतन्य नगर नांदेड येथे आले. त्यावेळी माझी व लोकसेवक अकबर, स्वच्छता निरिक्षक यांची साई मंदीर
परिसरात तसेच शरयु मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल संकेत हॉस्टेल रोडवर तरोडा बु. ता. जि. नांदेड येथे रोडवर
माझ्याकामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी त्यांनी मला सर्वासमोर त्यांना पैसे घेता येत नाहीत. असे म्हणाले त्यावेळी मी



Scanned with CamScanner

त्यांना माझे काम करा म्हणुन विनंती केली. त्यावेळी त्यांनी पैसे इतर सफाई कामगार यांचेकडे देण्याचे सांगितले, त्यावेळी मी त्यांना इतर सफाई कामगार यांना पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर त्यांनी मला मोटार सायकल मध्ये पैसे ठेवण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना पैसे हातात घेण्याची विनंती केली. त्यांनी पैसे हातात घेण्यास नकार दिल्याने मी अंथ्रासिन पावडर लावलेली २,०००/- रुपये (ज्यात पाचशे रुपये दराच्या चार भारतीय चलनी नोटा) लाच रक्कम लोकसेवक अकबर यांच्या गाडीच्या पेट्रोलच्या टाकीवरील कव्हरची चेन काढुन त्यात ठेवुन त्यांना लाच रक्कम ठेवल्याचे सांगिले. त्यानंतर त्याठिकाणाहुन निघुन आलोसे यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी पोह/कणसे यांनी माझ्याजवळील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन १०:०५ वाजता बंद केला. लोकसेवक अकबर हा कचऱ्याच्या गाडीत बसुन जात होता. त्यावेळी सापळा पथकाने लोकसेवक अकबर यास ताब्यात घेवुन त्यास सापळा पथकाचा परिचय दिला. त्यावेळी पोलीस निरिक्षक श्री वाघमारे साहेब यांनी लोकसेवक यांना त्यांचे पुर्ण नाव, गाव पत्ता याबाबत विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे नांव अकबर खान उस्मान खान, वय ४७ वर्ष, व्यवसाय नोकरी, पद-स्वच्छता निरिक्षक, नेमणुक सहायक आयुक्त झोन क.१, सांगवी बु. तरोडा बु. कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड रा. नारायण पाटील नगर डॉ. काब्दे हॉस्पीटलच्या पाठीमागे लालवाडी ता. जि. नांदेड असे असल्याचे सांगितले. त्यानंतर अकबर खान यास लाचेची रक्कम कुठे आहे असे विचारणा करता त्यांनी लाचेची रक्कम त्यांची हिरो होंडा पेंशन प्रो. कंपनीची मोटार सायकल क्रमांक MH 26 AA 7664 याचे टँकवरिल कव्हरमध्ये असल्याचे सांगितले पंचासमक्ष त्यांच्या मोटार सायकलच्या पेट्रोलच्या टाकीवरील कव्हरची चेन काढुन त्यातुन अॅथ्रासिन पावडर लावलेली २,०००/- रुपये (ज्यात पाचशे रुपये दराच्या चार भारतीय चलनी नोटा) लाच रक्कम जप्त केली आहे. त्यानंतर लोकसेवक अकबर व त्याचे ताब्यातील मोटार सायकल ताब्यात घेवुन सापळा पथक खाजगी व शासकीय वाहनाने लाप्रवि कार्यालयात हजर येवुन पुढील कार्यवाही केली आहे.

मी दिनांक ३०/०९/२०२४ रोजी लाप्रवि , नांदेड येथे दिलेल्या तकारी वरुन आज दिनांक ०१/१०/२०२४ रोजी करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी व सापळा पुर्व व सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक अकबर खान उस्मान खान, स्वच्छता निरिक्षक यांनी माझे सफाई कामाचे दिवसाचे खाडे अँडजेस्ट करण्यासाठी ४,०००/- रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता २,०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. तसेच उर्वरित २०००/- रुपये रक्कम पगार मिळाल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केले. म्हणून माझी अकबर खान उस्मान खान, वय ४७ वर्ष, व्यवसाय नोकरी, पद-स्वच्छता निरिक्षक, नेमणुक सहायक आयुक्त झोन क.१, सांगवी बु, तरोडा बु. कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड रा. नारायण पाटील नगर डॉ. काब्दे हॉस्पीटलच्या पाठीमागे लालवाडी ता. जि. नांदेड यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही होणेसाठी फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the Investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ganesh Sukdev Chavan(I (Inspector)) / 1234 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): पो नि सदानंद वाघमारे, ला प्र वि नांदेड **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.) सौ.वर्षा

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
सौ.वर्षा

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Ganesh Sukdev Cha
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 1234



Scanned with CamScanner